पशु-आहार

# सुधारित पध्दतीने करा चारा लागवड

डॉ. वा.नि. नारखेडे
डॉ. शरद नायक
(मो. ९८२२९९२८६४)
डॉ. विशाल सुतार
वसंतराव नाईक
मराठवाडा कृषी विद्यापीठ,
परभणी

जनावरांच्या संतुलित आहारात ओल्या आणि वाळलेल्या चाऱ्याचे खूप महत्त्व आहे. जनावरांना पोषक चारा उपलब्ध होण्यासाठी काही क्षेत्रावर चारापिकांच्या सुधारित जातींची लागवड करावी. सुधारित जाती आणि लागवडी पध्दतीमुळे चाऱ्याचे चांगले उत्पादन मिळते.

**मका :** जनावरांच्या आहारात सकस, रुचकर चारा म्हणून मका उपयुक्त आहे. यामध्ये ९ ते ११ टक्के प्रथिनांचे प्रमाण असते. पिकास मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारी जमीन आवश्यक असते. काळी कसदार, गाळाची, नदीकाठची जमीन मक्यास अत्यंत उपयुक्त असते. नांगरट करुन दोन ते तीन वेळा कुळवणी करणे गरजेचे आहे. लागवडीसाठी सपाट वाफे अथवा सऱ्या सोडाव्यात.

* जून ते ऑगस्ट या कालावधीत मक्याची पेरणी करावी. पेरणी ३० सें.मी. अंतरावर करावी. पेरणीसाठी हेक्टरी ७५ किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी अॅझोटोबॅक्टर जिवाणूसंवर्धक २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. * आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझिट, गंगा सफेद-२, गंगा-५, विजय या जातींची निवड करावी. * लागवडीपूर्वी १० ते १२ बैलगाड्या शेणखत पूर्वमशागतीच्या वेळेस जमिनीत मिसळावे. पेरणीच्या वेळी प्रतिहेक्टरी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश पेरणीच्या वेळेस द्यावे. पेरणीनंतर ३० दिवसांनी ५० किलो नत्र द्यावे. * एक कोळपणी करावी, तसेच ३० दिवसांनी एक खुरपणी करावी. * खरिपातील मक्यास पाण्याची तशी गरज लागत नाही. परंतु पावसाची ओढ असल्यास उपलब्धतेनुसार मक्यास पाणी द्यावे. * मका साधारणपणे ६०-६५ दिवसांत काढणीयोग्य होतो. ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना मक्याची कापणी करावी. हिरव्या चाऱ्याचे ५०० ते ६०० क्विंटल प्रतिहेक्टरी इतके उत्पादन मिळते. * खरीप हंगामात लागवड केलेल्या मक्यापासून मूरघास करुन ठेवल्यास त्याचा उपयोग इतर हंगामात करता येतो.

**ज्वारी :** पाऊस अनियमित जरी झाला तरी ज्वारीचा चारा चांगल्या प्रकारे वाढू शकतो.

* लागवडीसाठी काळी, कसदार, मध्यम ते भारी पण निचरा असणारी जमीन निवडावी. * जून ते ऑगस्टपर्यंत पेरणी करावी. दोन ओळींत २५ ते ३० सें.मी. अंतर ठेवून तिफणीने ५ ते ७ सें.मी. खोलीवर बियाणे पेरावी. हेक्टरी ४० किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाण्यास अॅझोटोबॅक्टर जिवाणूसंवर्धक २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. * लागवडीसाठी एम.पी. चारी, रुचिरा, पुसा चारी, फुले अमृता या जाती निवडाव्यात. * पूर्वमशागतीच्या वेळेस हेक्टरी १५ ते २० गाड्या शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे. प्रतिहेक्टरी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश पेरणीवेळी द्यावे. पेरणीनंतर एक महिन्याने ५० किलो नत्र प्रतिहेक्टरी द्यावे. * एक कोळपणी करुन एक खुरपणी करावी. * पावसाचा ताण पडल्यास १० ते १२ दिवसांनी पाणी देणे आवश्यक आहे. * ज्वारीची कापणी पीक फुलोऱ्यात असताना करावी. शक्यतो ६५ ते ७० दिवसांनी कापणी करावी. हिरव्या चाऱ्याचे ५०० ते ५५० क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते.

**बाजरी :** हे पीक पालेदार, रसाळ, गोड व मऊ असते. या पिकाचा उपयोग जनावरांचा चारा म्हणून केला जातो.

* लागवडीसाठी हलकी ते मध्यम व चांगली निचरा होणारी जमीन निवडावी. एक नांगरट करुन २ ते ३ कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. * लागवडीसाठी जायंट बाजरा, बायफ बाजरा या जातींची निवड करावी. * पूर्वमशागती वेळेस हेक्टरी १० ते १२ बैलगाड्या शेणखत जमिनीत मिसळून घ्यावे. तसेच प्रतिहेक्टरी ३० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश पेरणी वेळेस देऊन पेरणीनंतर ३० दिवसांनी पुन्हा ३० किलो नत्र प्रतिहेक्टरी द्यावे. * एखादी कोळपणी करावी. पाण्याचा ताण पडल्यास संरक्षित पाणी द्यावे. * ५५ ते ६० दिवसांनी पीक फुलोऱ्यात असताना कापणी करावी. हिरव्या चाऱ्याचे उत्पादन ४५० ते ५०० किलो प्रतिहेक्टरी मिळते. ■